# प्रास्ताविक

मार्च 2021 रोजी संपलेल्या वर्षासाठीचा हा अहवाल भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 151 अंतर्गत, महाराष्ट्राच्या राज्यपालांना सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

नागरी स्थानिक संस्थांची लेखापरीक्षा भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम, 1971, जो भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांना नागरी स्थानिक संस्थांच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्याचे आणि त्यावरील लेखापरीक्षा अहवाल विधानमंडळासमोर सादर करण्याचे अधिकार देतो त्यातील तरतुदींनुसार केली जाते.

2015-16 ते 2020-21 या कालावधीसाठीच्या ह्या अहवालात "महाराष्ट्रात चौऱ्याहत्तरावी संविधान सुधारणा अधिनियमाच्या अंमलबजावणीची परिणामकारकता" या विषयावरील संपादणूक लेखापरीक्षेचे निष्कर्ष समाविष्ट आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी जारी केलेल्या लेखापरीक्षणाच्या मानकांनुसार लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे.

**टिप: मूळ इंग्रजी अहवालावरुन अनुवादित; शंका समाधानासाठी कृपया इंग्रजी अहवाल पहावा.**